# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date: 09 October 2023
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
# आकाशवाणी औरंगाबाद
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक : ०९ ऑक्टोबर २०२३ दुपारी १.०० वा.

****

निवडणूक आयोगानं आज राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगढ आणि मिझोरम या पाच राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकांची घोषणा केली. राजस्थानमध्ये २३ नोव्हेंबरला मतदान होईल. मध्य प्रदेशमध्ये १७ नोव्हेंबरला, तेलंगणा मध्ये ३० नोव्हेंबरला, छत्तीसगढ मध्ये सात आणि १७ नोव्हेंबरला, तर मिझोराम मध्ये सात नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या सर्व राज्यांमध्ये तीन डिसेंबरला मतमोजणी होणार असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं.

****

इजरायल आणि हमासमध्ये सुरु झालेल्या संघर्षाचे पडसाद आता जगाच्या अर्थकारणावर उमटायला सुरुवात झाली आहे. यामुळे आज खनिज तेलाच्या किमतीत साडे चार टक्के वाढ झाली आहे. या संघर्षात आतापर्यंत अकराशेहून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे

****

मुंबई इथं आज केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या तिसर्या विभागीय बैठकीला सुरुवात झाली. आयुष मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी बैठकीला संबोधित केलं. महाराष्ट्रासह, गुजरात, राजस्थान, गोवा या राज्यांचे आणि दादरा नगर हवेली, दीव दमण, अंदमान निकोबार इथले मंत्री, वरिष्ठ आयुष अधिकारी यात सहभागी झाले आहेत.

****

केंद्र सरकारनं  देशातल्या सर्व सहकारी संस्थांना मजबूत करण्यासाठी अनेक पावलं उचलली असून, त्याअंतर्गत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी देशभरातल्या निबंधक कार्यालयांचं संगणकीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याबरोबरच १३ राज्यांमधल्या एक हजार ८५१ कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या संगणकीकरणालाही मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे २२५ कोटी रुपयांच्या या योजनेसाठी एक मध्यवर्ती प्रकल्प देखरेख विभाग स्थापन केला जाईल. या योजनेमुळे या कार्यालयांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि एकसूत्रीपणा येऊन नागरिकांना सुलभ रीतीनं सेवा मिळू शकतील.

****

न्यायदान यंत्रणा वेगवान करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड इथं काल कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश आणि प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयाचं उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते झालं, त्यावेळी फडणवीस बोलत होते. न्यायमूर्ती गवई यांनी यावेळी बोलताना, समाजाच्या शेवटच्या नागरिकांपर्यंत सर्वांना अल्पावधीत आणि कमीत कमी खर्चात न्याय देण्याचं काम या न्यायालयातून घडावं, अशी अपेक्षा व्यक्त केली.

****

माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला भेट देऊन आरोग्य यंत्रणेची पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णालयाचे अधिष्ठाता, तसंच रुग्णांशी देखील संवाद साधला. यानंतर आदित्य ठाकरे नांदेड आणि नागपूर इथल्या देखील शासकीय रुग्णालयांना भेट देणार आहेत.

****

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाद्वारे राज्यात गेल्या १५ महिन्यात १५ हजारांपेक्षा जास्त गोरगरीब गरजू रुग्णांना, १२३ कोटी ९० लाख रुपयांची आर्थिक मदत वितरीत करण्यात आली आहे. या कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी काल मुंबईत ही माहिती दिली. ही वैद्यकीय मदत मिळवण्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज नसून, सगळी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होते. यासाठी गरजू रुग्णांनी ८६ ५० ५६ ७५ ६७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असंही चिवटे यांनी सांगितलं.

****

लोकशाही व्यवस्थेत मराठी भाषा जगवण्याकरता लोकांनी दबाव निर्माण केला पाहिजे, तरच मराठीचं स्थान अबाधित राहील, असं मत, ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी व्यक्त केलं आहे. पुणे इथं काल सेंटर फॉर पॉलिसी अँड गव्हर्नन्स या संस्थेच्या वतीनं मराठी भाषा धोरण आणि अंमलबजावणी या विषयावरच्या

चर्चासत्रात ते बोलत होते. प्रशासकीय आणि न्यायालयीन मराठी भाषा, मराठी माध्यमातून शालेय आणि उच्च शिक्षण, मराठी भाषा संशोधन आणि ग्रंथ प्रसार या विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

****

दक्षिण मध्य रेल्वेनं चार नवीन रेल्वे गाड्या सुरु केल्या आहे. केंद्रीय पर्यटन मंत्री जी किशन रेड्डी आज सिकंदराबाद रेल्वे स्थानकावर काझिपेट ते पुणे या रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. तसंच त्यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून रायचूर - नांदेड, कुरनूल - जयपूर आणि बोधन - करीमनगर या गाड्यांची देखील सुरुवात केली.

****

सिंधुदुर्ग जिल्ह्यातून प्रवाशांना आता पहिल्यांदाच एसटीच्या शयनयान बसनं प्रवास करता येणार आहे. राज्य परिवहन महामंडळानं सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी असा सहा बस उपलब्ध करुन दिल्या आहेत. राजापूर, चिपळूण मार्गे बोरिवली, मुंबई, कोल्हापूर, पुणे मार्गे बोरिवली, मुंबई आणि लातूर या तीन मार्गांवर या बस धावणार आहेत.

****